| | |
|---|---|
| MHKO030072672022 | दाखल तारीख - १०/०८/२०२२<br>नोंदणी तारीख – १०/०८/२०२२<br>निकाल तारीख – २७/०४/२०२३<br>कालावधी - वर्षे - महिने - दिवस<br>०० - ०८ - १७ |

**कोल्हापूर येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात,**
**न्यायालय क्रमांक ०८, कोल्हापूर.**
**(पिठासीन अधिकारी विनया व्ही. गिराम )**

**<u>संक्षीप्त फौजदारी खटला क्र.४७१५/२०२२</u>**
**निशाणी क्र. ११/ब**

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र शासन तर्फे<br>राज्य उत्पादन शुल्क, विभागीय भरारी पथक, कोल्हापूर. |
| **अभियोग पक्षातर्फे** | | श्री. संग्राम सरनोबत<br>सहा. सरकारी अभियोक्ता |
| | | |
| **आरोपी** | | **जुगनू केशव कंजारभाट**<br>वय – ४६ वर्षे, धंदा – मजुरी,<br>रा. मेन रोड मातंग वसाहत, कंदलगांव, ता. करवीर, जि. कोल्हापूर. |
| **आरोपीतर्फे वकील** | | श्री. पी.एस. दाभोळे |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | – | १६/०७/२०२२ |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | – | २२२/२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | – | १६/०७/२०२२ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | – | १०/०८/२०२२ |
| दोषारोप ठेवलेचा दिनांक | – | १२/०१/२०२३ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | – | ०९/०२/२०२३ |
| युक्तिवाद दिनांक | – | २७/०४/२०२३ |
| न्यायनिर्णय दिनांक | – | २७/०४/२०२३ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | – | ---- |

**आरोपीची माहिती**

| अ. क्र. | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपातील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | फौ.प्र. सं.कलम ४२८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जुगनू कंशव कंजारभाट | – | १२/१/२०२३ | म.दा.अ.क.६५–ई अन्वये | निर्दोष मुक्तता | --- | --- |

अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्रमांक | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | हंबीरराव भाऊसो संकपाळ | ०८ | पंच |

अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेले दस्तऐवज

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | ०९ | पंचनामेवरील सही |

## न्या य नि र्ण य

(घोषित दिनांक २७ एप्रिल, २०२३)

१. आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम कलम ६५-ई अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप आहे.

## अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात पुढील प्रमाणे -

२. दिनांक १६/०७/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजणेचे सुमारास बालिंगा गावच्या हद्दीत नवीन वाशी नाका परिसर येथे एका पत्र्याच्या शेडमध्ये एका प्लॅस्टीकच्या कॅन मध्ये अंदाजे २० लिटर गावठी हातभट्टीची दारु, एक प्लॅस्टीकचा मग व पाच काचेचे ग्लास अवैध गावठी हातभट्टी दारुची विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या स्थितीत मिळून आला म्हणून आरोपीचे विरुध्द महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम कलम ६५-ई प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा नोंद करणेत आला आहे.

३. सदर गुन्ह्याचा तपास श्री. आर.जी. येवलुजे, दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, विभागीय भरारी पथक, कोल्हापूर यांनी केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले. मुद्देमाल जप्त केला. चौकशीअंती आरोपीविरुध्द पुरावा मिळुन आल्याने आरोपीचे विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. निशाणी क्रमांक ७ कडे आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम ६५–ई नुसार गुन्ह्याची प्ली नोंदविणेत आली. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगून खटला पुढे चालविण्याचे आहे असे सांगितले.

५. अभियोग पक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होण्यासारखा कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आला नसल्याने फौजदारी प्रकिया संहिता कलम ३१३ (१)(ब) प्रमाणे आरोपीचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६. प्रस्तुत प्रकरणातील सारांश तसेच अभिलेखावर दाखल पुरावा व कागदपत्रे तसेच दोन्ही वकीलांचा युक्तीवाद यांचा विचार करता खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दयावरील निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे दिले आहेत-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनाकं १६/०७/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजणेचे सुमारास बालिंगा गावच्या हद्दीत नवीन वाशी नाका परिसर येथे एका पत्र्याच्या शेडमध्ये आरोपी हा अवैध गावठी हातभट्टीची दारु विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगलेल्या स्थितीत मिळून आल्याने त्याने महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम कलम ६५-ई प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| २. | आदेश काय? | आरोपीची निर्दोष मुक्तता करणेत येते. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक १ बाबत -

७. अभियोग पक्षाने उपरोक्त सादर केलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे गुणदोषावर अवलोकन करण्यापूर्वी प्रामुख्याने नमुद करावे लागेल की, प्रचलित न्याय तत्त्व प्रणालीनुसार आरोपीचे अपराधाचे कृत्य शाबीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही अभियोग पक्षाची असते. सदरची जबाबदारी अभियोग पक्षाने बचावातील त्रुटी, विसंगती व खोटे पणाचा आधार न घेता सबळ विश्वासार्ह तोंडी व कागदोपत्री पुराव्याने निःसंशयपणे व निर्विवादपणे सिध्द करावयाचे असते. अभियोग पक्ष स्वतः ही जबाबदारी पार पाडत नाही, तो पर्यंत आरोपी हा कायद्याच्या कक्षेत निष्पाप समजला जातो. आरोपीच्या बचावातील कमकुवतपणाचा फायदा अभियोग पक्षास घेता येणार

नाही. जरी आरोपीने आपला बचाव निःसंशयरित्या शाबीत केला नाही. तरी त्या कारणावरुन त्यास शिक्षा देता येणार नाही. आरोपी आपला बचाव अशक्यतेवर दाखवून देऊ शकतो. जर अभियोग पक्षाच्या खटल्याबाबत संशय निर्माण झाला तर संशयाचा फायदा आरोपीस दिला गेला पाहिजे. तसेच उपलब्ध पुराव्यावरुन दोन परस्पर मते निर्माण होत असतील तर आरोपीच्या बाजुने झुकणारे मत अंगीकारले पाहिजे अशी कायद्याची व्यापक संकल्पना आहे.

८. प्रामुख्याने या ठिकाणी नमुद करावे लागेल की, आरोपीवरील दोषारोप शाबीत करणेसाठी अभियोग पक्षास, आरोपीच्या ताब्यातून परवाना नसताना गावठी हातभट्टीची दारु मिळून आली हा अंतर्भूत घटक सिध्द करावा लागेल.

९. आरोपीवरील दोषारोप शाबीत करणेसाठी सरकार पक्षाने एकच साक्षीदार तपासलेला आहे व निशाणी १० कडे पुरावा बंद केलेची पुरसीस दिलेली आहे. साक्षीदार क्रमांक १ जप्ती व घटनास्थळ पंच हंबीरराव यांची साक्ष निशाणी क्र. ०८ कडे नोंदविली. त्यांनी त्यांच्या जबाबात पोलिसांनी त्यांची एका कागदावर सही घेतल्याचे सांगितले आहे. परंतु जप्ती पंचनाम्यातील मजकुराबाबत कोणतीही माहिती नसल्याचे सांगितले आहे. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाचे कथनास पुष्टी दिलेली नाही. अभियोग पक्षाने त्यास उलटतपासाच्या स्वरुपामध्ये प्रश्न विचारले असता त्याचेकडून कोणतीही महत्त्वाची कबुली मिळविण्यात त्यांना यश प्राप्त झालेले नाही. त्यामुळे आरोपीचे ताब्यातून कथित तारखेस व ठिकाणी गावठी हातभट्टीची दारु जप्त केलेबाबत शंका निर्माण होते. त्यामुळे, त्याची साक्ष विश्वासार्ह वाटत नाही.

१०. तसेच अभियोग पक्षाला पुरेशी संधी देऊन ही अभियोग पक्षाने प्रस्तुत कामातील दुसरा पंच व इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली नाही.

११. अभियोग पक्षाचे कथनानुसार आरोपीच्या ताब्यातून एका प्लॅस्टीकच्या कॅन मधुन अंदाजे २० लिटर गावठी हातभट्टीची दारु, एक प्लॅस्टीकचा मग व पाच

काचेचे ग्लास जप्त केले व जप्त केलेल्या दारुतून नमुन्याकरीता १८० मि.ली.चे दोन बाटल्या घेतल्या होत्या व ती दारु रासायनिक पृथःकरणासाठी पाठविणेत आली होती. परंतु या कामी रासायनिक पृथःकरणाच्या अहवालाबाबत कोणताही पुरावा आणलेला नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यातून काही मुद्देमाल जप्त करणेत आलेला होता व जप्त करणेत आलेल्या मुद्देमालात गावठी हातभट्टीची दारु होती हे निःसंशयपणे सिध्द होत नाही. सबब, मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रमांक २ बाबत -**

१२. अभियोग पक्षास आरोपीने गुन्हा केलेचे सिध्द करता आलेले नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. आरोपीने जप्त मुद्देमाल त्याचा असल्याचे नाकारले आहे. त्यामुळे सदर मुद्देमालाची अपिल कालावधीनंतर विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. सबब, मुद्दा क्रमांक २ चे उत्तराकरीता मी खालील आदेश पारीत करते.

## आदेश

१. आरोपी **जुगनू केशव कंजारभाट** यांस फौजदारी प्रक्रिया संहिता कलम, २५५ (१) अन्वये महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम कलम ६५-ई अन्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीनकदबा रद्द करणेत येत आहे.

३. प्रस्तुत कामातील जप्त मुद्देमाल एक प्लॅस्टीक कॅन व त्यामधील अंदाजे २० लिटर गावठी हातभट्टीची दारु, एक प्लॅस्टीकचा मग व पाच काचेचे ग्लास यांची अपिल कालावधी संपलेनंतर नियमानुसार विल्हेवाट लावण्यात यावी.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) चे तरतुदीची पुर्तता करणेसाठी रुपये १५,०००/- चे बंधपत्र व जामीनपत्र पुढील सहा महिन्याचे कालावधीकरिता देणेत यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात सांगुन जाहीर करण्यात आला.)

Digitally signed by GIRAM VINAYA VISHWANATH
Location: KOLHAPUR
Date: 2023.04.28 11:18:02 +0530

कोल्हापूर.
दिनांक – २७/०४/२०२३.

(विनया व्ही. गिराम )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०८, कोल्हापूर.